अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या
जाती प्रमाणपत्रांची/दाव्यांची तपासणी.
तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व
अधिकाराबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शध्दिपत्र क्रमांक-एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक- २ मे, २००१.

वाचा:-आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक-एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०,दिनांक-९.९.१९९९

शध्दिपत्र:-प्रस्तावनेतील दिनांक ९ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४.१ मधील भाग "ग" पुढीलप्रमाणे आहे--"जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, निमशासकीय कार्यालये, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम ( उदा. एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादिमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव जागावर नेमणूकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे/दावे तपासणे."सदर भाग "ग" रद्द करण्यात येत असून त्याऐवजी **परिच्छेद ४.१ मधील भाग "ग" खाली सुधारित केल्याप्रमाणे** वाचावा--

"शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे ( Undertaking ), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळे, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह ), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह ), सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies ) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागांवर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

दिवाजोशी

( दि.वा.जोशी )
कक्ष अधिकारी

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.